पुण्य नगरी

'देवचंद'च्या सायबर वॉरिअर्सचे कौतुक; राज्यातील इतर गावांपुढे आदर्श

अर्जुनी बनले सायबर शिक्षित गाव

करड्याळ : देवचंद कॉलेज अर्जुननगर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमांतर्गत कागल तालुक्यातील अर्जुनी गावाला 'सायबर शिक्षित गाव' म्हणून घोषित करण्यात आले. महाराष्ट्रातील ते पहिलेच गाव ठरले. याचे प्रमाणपत्र नुकतेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन यांच्या उपस्थितीत अर्जुनीकरांना प्रदान करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी इंटरनेटचा वापर करताना तो सुरक्षितपणे करा आणि आपल्या पुढील पिढीला सक्षम बनवा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्विक हिल फाऊंडेशन पुणेच्या अध्यक्षा अनुपमा काटकर होत्या. त्यांनी सायबर वॉरिअर्सचे खूप कौतुक करून आजकालची पिढी काय करू शकते, याचे उत्तम उदाहरण वॉरिअर्सनी दाखवून दिले.

कार्यक्रमास गटविकास अधिकारी पं. स. कागलचे कुलदीप बोंगे, असोसिएट डायरेक्टर क्विक हिलचे अजय शिर्के, पोलीस उपनिरीक्षक अनिकेत कुडले, प्रभारी प्राचार्य डॉ. आर. एम. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. ए. एस. डोनर, अर्जुनी ग्रामपंचायत प्रशासन अधिकारी जे. एन. सातवेकर, ग्रामविकास अधिकारी प्रवीणसिंह सुळकुडे, अर्जुनी ग्रामस्थ, सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

को ऑर्डिनेटर प्रशांत कुंभार, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशीषभाई शाह आणि उपाध्यक्षा तृप्तीभाभी शाह यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रणोती सुतार हिने सायबर सुरक्षित गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुरा पुंडे आणि ज्ञानश्री दळवी यांनी केले.



करड्याळ : सायबर सुरक्षा टीमसोबत जि. प. कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन, देवचंद महविद्यालयाचे सर्व मान्यवर.

देवचंद'चे वॉरिअर्स : सायबर शिक्षित गाव या उपक्रमात देवचंद कॉलेजचा सायबर वॉरिअर्स क्लब आणि क्लबमधील रुद्र सुतार, प्राजक्ता खबरे, मधुरा पुंडे, प्रतीक्षा नाईक, सुजल पाटील, श्रावणी पाटील, साक्षी जाधव, ज्ञानश्री दळवी, अश्विनी मुळीक, वसुधा खोत, श्रावणी कावळे, पूजा जंगम, पल्लवी विजय पाटील, पल्लवी सतीश पाटील, पायल जाधव, चंदना मोरे, सानिका राणगे, वैष्णवी सुतार, प्रणोती सुतार, योगिता निकडे या सर्व वॉरिअर्सची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली.